MHJN020005472013

नियमित दिवाणी दावा क्र.२२१/२०१३
निलावती व इतर वि. शासन व इतर
CNRMHJN020005472013

**निशाणी क्रमांक १२७ वरील आदेश**

सदरचा अर्ज वादींतर्फे प्रतिवादी क्र.९ बेकायदेशीर विक्री पत्रासंबंधी मुद्दा कायम करणेकामी दिला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

सदरचा दावा वादींनी देविदास गिरजुबा डोंगरे यांचे कायदेशीर वारस असल्याने वारसाहक्का आधारे मालक व ताबेदार असून प्रतिवादी क्र.६ हौशल्याबाई यांनी नोंदवून दिलेले विक्रीपत्र क्र.१६९२/२०१३ व ८८/२०१७ बेकायदेशीर असल्याने प्रतिवादी क्र.३ यांनी दिलेला निर्णय बेकायदेशीर घोषित होवून मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.९ संजय भिसे यांचे नावाने नोंदवलेले विक्री पत्र क्र.८८/२०१७ बेकायदेशीर विना ताबा नोंदवल्याचे वादींनी दाव्यात कथन केले आहे व ते बेकायदेशीर घोषित करणेची मागणी केली आहे. सदर विक्री पत्रासंबंधी मुद्दा कायम करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर मुद्दा काढण्याची मागणी वादींतर्फे प्रतिज्ञापुर्वक केली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादी क्र.१ ते ६, ७ व ९ तर्फे अर्जास कोणतेही म्हणणे दिलेले नाहीत. त्यामुळे अर्ज त्यांचे म्हणणे शिवाय चालविण्यात येत आहे. प्रतिवादी क्र.६ व ८ तर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. अर्जातील सर्व विरोधी कथने प्रतिवादी क्र.८ यांनी नाकारली आहे. सर्व कथनांचा मुद्दांमध्ये समावेश झालेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४) वादीं व प्रतिवादी क्र.८ तर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला . कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) वादींतर्फे सदरचा अर्ज दावा वादींच्या पुराव्याकामी नेमलेला असताना दिला आहे. त्यानुसार वादींनी दाव्यातील प्रतिवादी क्र.९ चे विक्री पत्र क्र.८८/२०१७ संबंधी कथनांबाबत मुद्दा आवश्यक असल्याने तो काढण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी क्र.८ तर्फे सर्व कथनांच्या अनुषंगाने मुद्दे काढले असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

६) अर्जातील मागणीच्या अनुषंगाने अभिलेखावरील दावा, प्रतिवादी क्र.९ यांची कैफियतीचा विचार करता दाव्यातील मुद्दयांचे वाचन केले असता वादींचे दाव्यातील प्रतिवादी क्र.९ च्या विक्री पत्र क्र.८८/२०१७ बाबत कोणताही मुद्दा काढलेला आढळून

येत नाही. त्याबाबतचा मुद्दा काढणे दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेकामी आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होणार आहे. याकरिता सदरचा अर्ज खर्चाशिवाय मंजुर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १) | सदरचा अर्ज खर्चाशिवाय मंजुर करण्यात येत आहे. |
| २) | परिणामतः निशाणी क्र.५५ वर प्रतिवादी क्र.९ चे विक्री पत्र क्र.८८/२०१७ बाबत अतिरिक्त मुद्दा काढण्यात यावा. |

स्वाक्षरीत/-
(एन. एल. येवलेकर)
दिनांकः ११/१२/२०२३ दिवाणी न्यायाधीश व.स्तर
जालना

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय व.स्तर, जालना

दिनांक : ११/१२/२०२३

सही/–

एम. डी. आढे

लघुलेखक (ग्रेड–३)